II

मसुदा
क्र. ४/२०१६-१७

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठ

व्यवस्थापन परिषदेची सभा *शनिवार,दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ रोजीची स्थगित सभा शुक्रवार, दिनांक १८ नोव्हेंबर, २०१६ रोजी दुपारी ४.००*वाजता सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२. येथे सुरू झाली. सभेमध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

१. डॉ. संजय व्ही. देशमुख, (कुलगुरू)
२. डॉ. एम. ए. खान, (कुलसचिव)
३. श्री. सिध्दार्थ खरात (उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग)
४. डॉ. संतोष जाधव ( संचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग)
५. डॉ. अनिल पाटील, (संचालक, बी.सी.यु.डी.)

श्री. अ.आ. फळणीकर, वित्त व लेखा अधिकारी आणि श्री. दिपक वसावे, स्थानापन्न परीक्षा नियंत्रक हे कायम निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

बाब ३: To grant sabbatical leave for a period of one year from August, 2015 to July, 2016 as per letter No. UDS/PSV/MGI/MAU/15/8730 dated 30th July, 2015 received from Dr. P.S. Vivek Professor, Department of Sociology.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, डॉ. पी. एस. विवेक यांना विद्यापीठ स्तरावर दिलेल्या sabbatical leave ला व्यवस्थापन परिषद कार्योत्तर मंजुरी देत आहे आणि यांच्या वेतनासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवावा आणि शासनाकडे पाठपुरावा करावा.

बाब ५ : Regarding granting approval to teachers appointed between 1991-92 but not having Selection Committee Reports.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, ही बाब शासनाचे मार्गदर्शन घेऊन पुन्हा व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्यात यावी.

बाब ६: पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण होण्याच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीचे वेळापत्रक.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, शासनाचे परिपत्रक क्र. एसआरव्ही—२०१५ /प्र.क्र. ५६६ / का—१२, दिनांक ०८ जानेवारी, २०१६ प्रमाणेच पुढील पदोन्नती करण्यात याव्यात.

बाब ७: Justification for starting B. Sc. (Aviation) course at Garware Institute for Career Education and Development

ठराव: It is **resolved** that,Justification provided by Director (I/c), GICED for starting B. Sc. (Aviation) course at Garware Institute for Career Education and Development be accepted and permission is granted to start the said course from the academic year 2016-17.

बाब ८: जमनालाल बजाज शिक्षण संस्थेने निकाल जाहीर झाल्यानंतर सहा महिन्यानंतर पाठविलेल्या अंतर्गत गुणासंबंधित.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, ही बाब विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन त्यांचा निकाल घोषित करण्यात यावा असे ठरले. परंतु अशी वेळ परत येऊ नये म्हणून तत्कालीन संचालकांना हलगर्जीपणा बद्दल समजपत्र देण्यात यावे.

बाब ९: वित्त व लेखा समितीच्या दिनांक ३१ मे, २०१६ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त

ठराव: असा ठराव करण्यात आला की, वित व लेखा समितीच्या दिनांक ३१ मे, २०१६ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मंजूर करण्यात यावे.

बाब १०: भारताचे राष्ट्रपती डॉ. शंकर दयाळ शर्मा सुवर्ण पदक २०१६ करिता निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेकडून एका सदस्याची नेमणूक करण्याबाबत.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, भारताचे राष्ट्रपती डॉ. शंकर दयाळ शर्मा सुवर्ण पदक २०१६ करिता निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेकडून एका सदस्याची नेमणूक करण्याबाबतचे अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात येत आहेत.

बाब ११: Shri Ajay A. Murudkar, Candidate of Fifth Year L.L.B. examination held in First Half of the Year 2001, submitted application dated 14th October, 2015 and 01 May, 2016 requested therein to restore and return the documents deposited to the University by him his fifth year LL.B. degree (Flagged "A")

Resolution: Board of Examination in its meeting held on 16th May, 2016 vide item No.4 resolved as under :

> "The above matter was placed before the members for discussion. The decision passed by the Court of additional Chief Metropolitan Magistrate, 47th Court Esplanade, Mumbai (Serial No 1070/P/2003, an order dated 3/2/2014 ) is as below :-
>
> (i) The accused No. (1) Ajay Arun Murudkar (2) Lachmandas Kishinchand Sachadev and (3) Ashok Baburao Waghmare are hereby acquitted under Section 248(1) of Cr. PC of the offence punishable under Section 120-B, 417, 466, 467, 468. 471 r/w, 34 of Indian Penal Code.
> (ii) The bail bonds of accused stand cancelled.
> (iii) Pronounced and dictated in Open Court.
>
> In view of what is stated above and on going through the Court Order, it was **resolved** that since Ajay Arjun Murudkar has been acquitted from all charges by the Court, the decision given by the Unfair Means Committee on the basis of the complaint against Ajay Arjun Murudkar stands cancelled. As per the Court decision, the Marksheet and Degree certificate be restored to Shri. Ajay Arjun Murudkar and an item be placed before the Management Council."

The recommendations of Board of Examinations vide its item No. 4 be accepted and in accordance there with the credentials of Shri. Ajay Arjun Murudkar be restored and degree certificate and marksheet of Shri. Ajay Arjun Murudkar, deposited with the University be returned in response to his request.

बाब १२: Posession of land in Ratnagiri Sub- Centre.

Resolution: It is **<u>resolved</u>** that, Posession of land located at Thibaw Point earmarked for Ratnagiri Sub- Centre taken from the Collector, Ratnagiri on payment of precise amount fix by the Government. University Engineer be requested to arrive at the total cost of the said land by visiting office of the Collector Ratnagiri.

बाब १३: एस आय ई एस कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सायन यांच्याकडून प्राप्त झालेले पत्र दिनांक १४ ऑगस्ट,२०१५ चे पत्र (पताका 'अ') श्री. सिंग राहुल दिनेश या विद्यार्थ्याचा परिक्षेचा फॉर्म BMS(Sem-VI) (Revised) मध्ये पाठवला. म्हणून सदर महाविद्यालयाकडून झालेल्या चुकीची दुरूस्ती म्हणजेच Revised Courseमधून CBSGS Courseमध्ये बदल करून देण्याबाबत.

ठराव: असा ठराव करण्यात आला की,एस आय ई एस कला, विज्ञान, व वाणिज्य महाविद्यालय, सायन, या महाविद्यालयाकडुन दि. १४ ऑगस्ट, २०१५ रोजी प्राप्त झालेल्या पत्रानुसार श्री. सिंग राहुल दिनेश या विद्यार्थ्यांचा परिक्षा फॉर्म Revised Courseमधून CBSGS Courseमध्ये बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच इथुन पुढे अशा प्रकारचे कुठलेही प्रकरण जर आले तर प्रति विद्यार्थी रू. १०,००० आकारावे. अशी बाब वारंवार होऊ नये म्हणून परिक्षा नियंत्रकाने सर्व महाविद्यालयांना परिपत्रक काढून सजग राहण्याबद्दल आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

बाब १४: सेंट जोसेफ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, विरार यांच्याकडून प्राप्त झालेले क्र.९९७/१५-१६ दिनांक १८ एप्रिल, २०१६ चे पत्र (पताका 'अ') श्री. मोहिते स्वप्नील राजू व श्री. मचाडो डॅनियल जेम्स हया विद्यार्थ्यांचा परीक्षा फॉर्म BMS (Sem-V)(Revised) मध्ये पाठविला. म्हणून सदर महाविद्यालयाकडून झालेल्या चुकीची दुरूस्ती म्हणजेच Revised Course मधून CBSGS Courseमध्ये बदल करून देण्याबाबत.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, सेंट जोसेफ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, विरारया महाविद्यालयाकडुन दि. १८ एप्रिल, २०१६ रोजी प्राप्त झालेल्या पत्रानुसार श्री. मोहिते स्वप्नील राजू व श्री. मचाडो डॅनियल जेम्स हया विद्यार्थ्यांचा परीक्षा फॉर्म Revised Course मधून CBSGS Courseमध्ये बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच इथुन पुढे अशा प्रकारचे कुठलेही प्रकरण जर आले तर प्रति विद्यार्थी रू. १०,००० आकारावे. अशी बाब वारंवार होऊ नये म्हणून परिक्षा नियंत्रकाने सर्व महाविद्यालयांना परिपत्रक काढून सजग राहण्याबद्दल आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

बाब १५: नांनजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला,महाविद्यालयाकडून प्राप्त झालेले क्र.१९३/१५-१६ दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ चे पत्र (पताका 'अ') या संस्थेच्या चुकीमुळे बेराडिया राहुल ईश्वर BMS(Sem-VI)(Revised) ATKT चा परीक्षा फॉम BMS (Sem-VI)( CBSGS) मध्ये पाठविला. म्हणून सदर महाविद्यालयाकडून झालेल्या चुकिची दुरूस्ती म्हणजेच CBSGS Course मधून Revised Courseमध्ये बदल करून देण्याबाबत.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, नांनजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला, महाविद्यालय ठाणे, या महाविद्यालयाकडून दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी प्राप्त झालेल्या पत्रानुसार बेराडिया राहुल ईश्वर या विद्यार्थ्यांचा

परीक्षा फॉर्म CBSGS Course मधून Revised Course मध्ये बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच इथुन पुढे अशा प्रकारचे कुठलेही प्रकरण जर आले तर प्रति विद्यार्थी रू. १०,००० आकारावे. अशी बाब वारंवार होऊ नये म्हणून परिक्षा नियंत्रकाने सर्व महाविद्यालयांना परिपत्रक काढून सजग राहण्याबद्दल आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

बाब १६: Report of the Fact Finding Committee consisting of Justice D.G. Deshpande (former Judge Bombay High Court) in the matter of Shri Mustansir Dalve, Professor, Sir J.J. College of Architecture.

ठराव: असा ठराव करण्यात आला की,Justice D.G. Deshpande कमिटीचा अहवाल मान्य करण्यात आला. पुढे असा ही ठराव करण्यात आला की, विभागाने डॉ. श्री. दळवी हयांना निलंबित का करण्यात येऊ नये अशी एक महीन्याची नोटीस देऊन तदनंतर १५ दिवसात निलंबनाची कार्यवाही पुर्ण करावी.

बाब २२: A proposal regarding the approval for the minutes of the V.C. Fund meeting held on Wednesday, 27th July, 2016.

Resolution: It is **resolved** that, A proposal regarding the approval for the minutes of the V.C. Fund meeting held on Wednesday, 27th July, 2016. be accepted.

बाब २३: मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालये व विद्यापीठ विभागात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या हितासाठी सामुहिक विमा योजना नुतनीकरणासाठी मान्यता मिळणेबाबत व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्याची बाब.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, नॅशनल इंन्शुरन्स कंपनी लिमीटेड व ओरीयन्टल इंन्शुरन्स कंपनी लिमीटेड या दोन कपंन्याच्या निविदा मंजुर करण्यात येत आहेत. तसेच, मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालये व विद्यापीठ विभागात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या हितासाठी शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ ते २०१७-२०१८ करीता नॅशनल इंन्शुरन्स कंपनी लिमीटेड व ओरीयन्टल इंन्शुरन्स कंपनी लिमीटेड यांना सामुहिक विमा योजनेस नुतनीकरणासाठी मान्यता देण्यात येत आहे.

बाब २६: विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना न.F-3-1/2009दिनांक ३० जून, २०१०, शासन निर्णय संकीर्ण-२०११/(२५-११) विशि-१ दिनांक १५ फेब्रुवारी, २०११ आणि मुंबई विद्यापीठ परिपत्रक क्र. CONCOL/TAU/40 of 2012-13 dated 19th March, 2013नुसार विद्यापीठातील विविध विभागातील शिक्षकांना सहायक प्राध्यापक, स्टेज १ ते स्टेज २ आणि स्टेज २ ते स्टेज ३ (CAS) अंतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळण्यासाठी छाननी व मुल्यमापन समितीच्या अहवालातील त्रुटी दुरूस्त करण्याबाबत सादर.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठातील विविध विभागातील शिक्षकांना सहायक प्राध्यापक, स्टेज १ ते स्टेज २ आणि स्टेज २ ते स्टेज ३ (CAS) अंतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळण्यासाठीचे अनुक्रमांक २ व ४ येथील डॉ. सुंदर राजदिप, सहायक प्राध्यापक व डॉ. मनोहर माने, सहायक प्राध्यापक यांचे प्रस्ताव परत छाननी समितीकडे पाठवावे व समितीच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करावी. तसेच उर्वरित अनुक्रमांक १ व ५ येथील डॉ. राजेश कांबळे, सहायक प्राध्यापक व डॉ. श्रीमती. माधवी नरसाळे, सहायक प्राध्यापक यांच्या बाबतची प्रस्तावीत बाब व अनुक्रमांक ३ येथील श्रीमती. अर्चना गौरे, सहायक प्राध्यापक यांच्या बाबतचा खुलासा मान्य करण्यात येत आहे.

बाब ३०: शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे परीक्षेच्या कामकाजासाठी असलेल्या मानधनात वाढ करण्याबाबत.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २८ मे २०१५ रोजी झालेल्या सभेत बाब क्र. २८ अन्वये पारित झालेला ठराव रदद् करण्यात यावा. त्याऐवजी पुढील प्रमाणे ठराव पारित करण्यात येत आहे.

"Resolved that the proposal for Revision in Examination fees and remuneration to the Faculty and Staff Engaged In Examination work **isaccepted**& that in accordance therewith, the Rules & Regulations to such effect as per Annexure be accepted.

It is further **resolved** that, the Statue 483-A & Statue 483-B on the said subject be repealed".

बाब ३२: Departmental enquiry of Dr. Neeraj Hatekar

ठराव: व्यवस्थापन परिषदेच्या असे निदर्शनास येत आहे की, डॉ. नीरज हातेकर यांचे दिनांक ४ जानेवारी, २०१४ रोजीच्या पत्रान्वये केलेले निलंबन मागे घेत असल्याबाबतच्या प्रशासनाने त्यांना दिलेल्या दिनांक २० जानेवारी, २०१४ रोजीच्या पत्रातील –

" Dr. Neeraj Hatekar, Professor, University Department of Economics is hereby informed that the Management Council at its meeting held on 18th January, 2014 has recommended to revoke the suspension and continue the departmental enquiry initiated by the University of Mumbai through its order mentioned above in reference.

Departmental inquiry against you will be held in respect of your misconduct."

या वाक्यांच्या अनुषंगाने डॉ. नीरज हातेकर यांची ४ जानेवारी, २०१४ च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे कथित गैरवर्तणूकीबाबतची विभागीय चौकशी २० जानेवारी, २०१४ चे पत्र देण्यापूर्वी आणि दिल्यानंतरही त्यांच्यातर्फे कुठल्याही प्रकारची गैरवर्तणूक त्यांच्या विभागातील संपूर्ण सेवेच्या कालावधीत झाली नसल्याचे अथवा त्यांच्याबाबत तशा प्रकारची कुठलीही तक्रार/पत्रव्यवहार कुठल्याही विभागप्रमुखाने अथवा विद्यापीठ प्रशासनातील कुठल्याही वरिष्ठ अधिका-याने कधीही केलेली/केलेला नसल्याचे निदर्शनास आले असल्यामुळे त्यांची विभागीय चौकशी करावी हा मुद्दाच रद्दबादल ठरतो.

त्यानुसार व्यवस्थापन परिषद असा ठराव करीत आहे की, डॉ. नीरज हातेकर यांची कथित गैरवर्तणूकीच्या अनुषंगाने कोणतीही विभागीय चौकशी सुरूच झालेली नसल्याने अथवा प्रलंबित नसल्याने सदर मुद्दा रद्दबादल करण्यात येत आहे व सदर प्रकरण विद्यापीठ स्तरावर बंद करण्यात यावे व तसे सुधारित पत्र डॉ. नीरज हातेकर यांना देण्यात यावे.

बाब ३५: मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागांतून राबविण्यात येणा-या विविध योजनांतर्गत संलग्नित महाविद्यालये/विद्यापीठ विभांगातील विद्यार्थ्यांना निधी वाटपास मान्यता मिळणेबाबत व त्यासाठी संचालक विद्यार्थी कल्याण विभाग यांना मार्गदर्शन करण्यासाठी सल्लागार समितीचे गठण करून त्यास मान्यता मिळणेबाबात.

ठराव: असा ठराव करण्यात आला की,मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागांतून राबविण्यात येणा-या विविध योजनांतर्गत संलग्नित महाविद्यालये/विद्यापीठ विभांगातील विद्यार्थ्यांना निधी वाटपास मान्यता मिळणेबाबत व त्यासाठी संचालक विद्यार्थी कल्याण विभाग यांना मार्गदर्शन करण्यासाठी खालील गठीत केलेल्या सल्लागार समितीस मान्यता देण्यात आली.

१. डॉ. एम. ए. खान, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, अध्यक्ष
२. श्री. अ. आ. फळणीकर, वित व लेखा अधिकारी, मुंबई विद्यापीठ, पदसिध्द सदस्य
३. श्री. भुजंग कि. अहिरे, प्र. ग्रंथापाल, जवाहरलाल नेहरू ग्रंथालय, मुंबई विद्यापीठ, सदस्य

४. डॉ. अंबूजा साळगांवकर, संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था, कलिना, सदस्य
५. डॉ. पी. एम. डोंगरे, विभागप्रमुख, जैव-भौतिकशास्त्र विभाग, सदस्य
६. डॉ. मृदुल निळे, सहायक प्राध्यापक, नागरीशास्त्र आणि राज्यशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ, सदस्य
७. डॉ. सुरेश किसनराव उकरंडे, स्थापत्य अभियांत्रिकी अभ्यास मंडळ, सदस्य
८. प्राचार्य डॉ. अशोक पी. महाजन, प्रगती महाविद्यालय, डोंबिवली, सदस्य
९. प्राचार्य डॉ. नरेंद्र बी. पवार, के. एम. सी. महाविद्यालय, खोपोली, सदस्य
१०. श्री. मोहन ग. होगवडेकर, समन्वयक, उपकेंद्र, मुंबई विद्यापीठ, सिंधुदुर्ग, सदस्य
११. प्राचार्य डॉ. इंदिरा शुक्ला, गोखले एज्युकेशन सोसायटीचे शिक्षण व संशोधन महाविद्यालय, परेल, सदस्य
१२. प्राचार्य डॉ. आनंदा अमृत महाहल, सोफिया महाविद्यालय, महालक्ष्मी, सदस्य
१३. प्राचार्य डॉ. विट्टल शिवणकर, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, वाशी, सदस्य
१४. प्राचार्य डॉ. नरेंद्र परशुराम तेंडुलकर, आठले सप्रे पित्रे महाविद्यालय, देवरूख, सदस्य
१५. प्राचार्य डॉ. भगवान अभिमानसिंग राजपुत, कॉ. गोदावरी शामराव परूळेकर महाविद्यालय, तलासरी, सदस्य
१६. डॉ. सुरेंद्र ठाकूरदेसाई समन्वयक, उपकेंद्र, मुंबई विद्यापीठ, रत्नागिरी सदस्य
१७. प्राचार्य डॉ. शहेदा रंगुनवाला, वसंतराव नाईक महाविद्यालय, मुरूड, रायगड, सदस्य
१८. प्राचार्य डॉ. अजय भांमरे, डी. ए. व्ही. महाविद्यालय, भांडुप, मुंबई
१९. डॉ. सुनिल पाटील संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, सदस्य सचिव

बाब ३६: Granting of sabbatical leave to Dr. Anuradha Misra

ठराव: "असा ठराव करण्यात आला की, डॉ. अनुराधा मिश्रा यांना Theory Division of European Organization for Nuclear Research (CERN), Geneva and Institute of Mathematical Sciences, Chennai येथून आलेल्या निमंत्रणानुसार त्यांनी केलेल्या १ डिसेंबर, २०१६ ते ३० नोव्हेंबर, २०१७ पर्यंतच्या

sabbatical leave मंजुरीच्या मागणीनुसार डॉ. अनुराधा मिश्रा यांच्या sabbatical leave ला व्यवस्थापन परिषद मंजुरी देत आहे आणि त्यांना शासनाच्या प्रचलित नियमांप्रमाणे sabbatical leave च्या काळातील वेतन शासनातर्फे मिळण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठवावा आणि शासनाकडे पाठपुरावा करावा".

बाब ३८: वित्त व लेखा समितीच्या दिनांक १२ जुलै, २०१६ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मान्यतेबाबत.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, वित्त व लेखा समितीच्या दिनांक १२ जुलै, २०१६ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले आहेत.

बाब ४३: उपकुलसचिव व सम कक्ष अधिका-यांना ब्लेझर देणेबाबत.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठात कार्यरत असलेल्या उपकुलसचिव व समकक्ष अधिका-यांना ब्लेझर शिवून देण्याचे मान्य करण्यात आले.

बाब४४: विद्यापीठातील अधिका-यांनी पी.एच.डी. पदवी प्राप्त केल्यास अशा अधिका-यांना एक रक्कमी प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठातील ज्या अधिका-यांनी पी.एच. डी. पदवी प्राप्त केली असेल अशा अधिका-यांना एक रक्कमी रू. १०,००० प्रोत्साहन भत्ता देण्याबाबतचा प्रस्ताव मान्य करण्यात आला.

बाब४५: विद्यापीठ उपकुलसचिव व सहायक कुलसचिव व समकक्ष अधिकारी यांना मिळणाऱ्या दुरध्वनी देयक प्रतीपूर्ती रकमेत वाढ करणे बाबत.

ठराव: असा ठराव करण्यात आला की,विद्यापीठ उपकुलसचिव व समकक्ष अधिकारी यांना दुरध्वनी देयक प्रतीपूर्ती च्या ऐवजी Jio4 – G मोबाईल व मोबाईल सेवा देण्याचे मान्य करण्यात आले.

बाब४६: विद्यापीठाचे प्रशासन कार्यक्षमतेने व गतिमान होण्यासाठी उपकुलसचिव संवर्गातील सहा पदे अनुक्रमे अतिरिक्त कुलसचिव, अतिरिक्त परीक्षा नियंत्रक, अतिरिक्त संचालक व अतिरिक्त वित्त व लेखा अधिकारी या संवर्गात अपग्रेड करण्याबाबत.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठावरील वाढलेला कामाचा भार तसेच विद्यापीठाचे प्रशासन अधिक कार्यक्षम व गतिमान होण्यासाठी उपकुलसचिव संवर्गातील (वरिष्ठ) सहा अधिका-यांना सहकुलसचिव (Joint Registrar) – २ पदे, सहपरीक्षा नियंत्रक – २ पदे, सहसंचालक –

१ पद, व सहवित्त व लेखा अधिकारी - १ पद, या संवर्गात अपग्रेड करण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशींसह शासनाकडे मान्यतेसाठी पाठवण्यात यावा.

व्यवस्थापन परिषदेच्या असे निर्देशनास आले की, शासनाचे ऑक्टोबर, २०१३ मध्ये प्राप्त झालेल्या पत्राानुसार मुंबई विद्यापीठाने नोंव्हेबर,२०१३ मध्ये प्रधान सचिव, उच्च तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या नावे प्रस्ताव पाठविला होता. परंतु अदयाप काही उत्तर मिळाले नाही. व हा प्रस्ताव पाठविताना परिषदेची मान्यताही घेण्यात आली नव्हती.

विद्यापीठातील वरिष्ठ उपकुलसचिवांची १५-२० वर्ष एकाच पदावरती काम करून व त्यांना पदोन्नतीसाठी संधी उपलब्ध नसल्यामुळे आणि सतत एकाच पदावर काम कराव लागत असल्यामुळे स्वभावात निरूउत्साहीपणा, नाराजीचे प्रमाण वाढत असल्याने नोंव्हेबर, २०१३ मध्ये शासनाकडे पाठविलेल्या सध्या अस्तित्वात असलेल्या पदांमधुन ६ पदे उपग्रेड करणे बाबतच्या प्रस्तावाचा शासन स्तरावर पाठपुरावा करावा.

आता पुढे असा ठराव करण्यात येत आहे की, शासनाकडे नोंव्हेबर,२०१३मध्ये पाठविलेला प्रस्ताव व्यवस्थाापन परिषदेच्या पुढील शिफारशी सह शासनाकडे पुन्हा पाठविण्यात यावा. सह-कुलसचिव- २ पदे, सह-संचालक- १ पद, सह-परीक्षा नियंत्रक- २ पदे, आणि सह-वित्त व लेखा अधिकारी- १ पद, या पदाकरीता तीन वर्षाचा अनुभव असलेल्या उपकुलसचिवांना तीन वर्षाकरीता चक्रीय पध्दतीने पदोन्नती देण्यात यावी व असाच ठराव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा.

बाब४७: विद्यापीठ उपकुलसचिव व सहायक कुलसचिव व समकक्ष अधिकारी यांना मिळणाऱ्या प्रासंगिक भत्त्याच्या रक्कमेत वाढ करणेबाबत.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठ उपकुलसचिव व सहायक कुलसचिव व समकक्ष अधिकारी यांना मिळणाऱ्या प्रासंगिक भत्त्याच्या रक्कमेत वाढ करणेबाबतचा प्रस्ताव वित्त व लेखा समितीपुढे ठेवण्यात यावा व त्यांच्या शिफारशीसह पुन्हा व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्यात यावा.

बाब४८: वित्त व लेखा समितीच्या दिनांक २७ ऑक्टोबर, २०१६ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, वित्त व लेखा समितीच्या दिनांक २७ ऑक्टोबर, २०१६ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले आहेत.

-----------
उपकुलसचिव

---------
कुलसचिव

---------
कुलगुरू